# नगर पंचायत कोरपना


## ता.कोरपना जि. चंद्रपुर

दूरध्वनी क्रमांक - ९०२२१११३२६५ ईमेल: **korpananagar@gmail.com**


### जाहीर सूचना

**"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५"**

**"अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत**

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यातंर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६५ सेवाची यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करून नगरप्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश -२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास नगरपंचायत कोरपना कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपंचायत तर्फे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी कोरपना नगरपंचायतच्या नोटीस बोर्ड प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच नगरपंचायतीच्या https://mahaulb.in/PortalSite/# या संकेतस्थळावरती माहिती प्रकाशित करण्यात आलेली आहे.

स्वा/-

येमाजी गोविंद धुमाळ

मुख्याधिकारी

नगर पंचायत कोरपना